दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स



संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १७१ । बुधवार २५ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## रामनवमी मिरवणुकीसाठी पारंपरिक मार्गाचा आग्रह

### आमदार संग्राम जगताप यांची एसपींसमवेत बैठक । जिल्हाधिकारी घेणार अंतिम निर्णय

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर– रामनवमी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर उद्या, गुरुवारी नगर शहरात सकल हिंदू समाजाच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीचा मार्ग पारंपरिक असावा, यासाठी रामभक्त आग्रही असून, तशी मागणी प्रशासनाकडे करण्यात आलेली आहे. परंतु त्यावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. या पार्श्वभूमीवर आमदार संग्राम जगताप यांनी आज, बुधवारी दुपारी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी झालेल्या बैठकीस हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यासंदर्भातील अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना असून, पारंपरिक मार्गाबाबत काय निर्णय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

**असा आहे पारंपरिक मार्ग**

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा-माळीवाडा वेस-पंचपीर चावडी-आशा टॉकीज चौक-माणिक चौक-भिंगारवाला चौक-कापडबाजार-तेलीखुंट-चितळे रोड-चौपाटी कारंजा चौक-दिल्ली गेट असा पारंपरिक मार्ग असून, काही वर्षांपूर्वी झालेल्या वादाच्या प्रसंगामुळे प्रशासन रामनवमी मिरवणुकीला या मार्गावरून परवानगी देण्यास नकार देत आहे.

नगर शहरात रामनवमीनिमित्त कार्यकर्त्यांचा उत्साह पाहायला मिळत आहे. उद्या भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, ही मिरवणूक पारंपरिक मार्गावरूनच निघावी, असा सकल हिंदू समाजाचा आग्रह आहे. त्यासाठी आमदार जगताप यांनी पुढाकार घेतलेला आहे. मागील वर्षीही जगताप यांनी यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. परंतु शेवटच्या टप्प्यात कौटुंबिक कारणामुळे त्यांना हा विषय मार्गी लावता आला नाही. यावर्षी आमदार जगताप हे पारंपरिक मार्गासाठी आग्रही असून, प्रशासनाकडे सुरुवातीपासून पाठपुरावा सुरू आहे. आज एसपींसमवेत झालेल्या बैठकीत यावर चर्चा होऊन हा अधिकार जिल्हाधिकारी यांचा असल्याचे एसपींनी स्पष्ट केले. त्यामुळे जिल्हाधिकारी यांच्याकडून पारंपरिक मार्गावरून मिरवणुकीस परवानगी मिळणार का, याकडे सकल हिंदू समाजाचे लक्ष लागले आहे.

## सुमन काळे मृत्यूप्रकरण पुन्हा चिघळणार

### । राज्य गुन्हे अन्वेषणच्या तपासावर आक्षेप, एसआयटी स्थापन करण्याची मागणी । आ.विक्रम पाचपुते यांनी अधिवेशात वेधले लक्ष

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सुमन काळे मृत्यू प्रकरण पुन्हा चिघळणार असून श्रीगोंद्यचे आमदार विक्रम पाचपुते यांनी विधीमंडळात लक्षवेधी प्रश्न उपस्थित करून राज्य गुन्हे अन्वेषण शाखेवर आक्षेप घेऊन एसआयटी स्थापन करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे सुमन काळे प्रकरणाशी निगडीत असलेल्या आरोपी आणि व्यक्तींची पुन्हा कोंडी होण्याची शक्यता आहे.



श्री. विक्रम बबनराव पाचपुते

दरम्यान गृहराज्य मंत्री पंकज भोयर यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री निर्णय घेतील असे विधीमंडळात स्पष्ट केले आहे.

याविषयी थोडक्यात माहिती अशी की, पारधी समाजसेविका सुमन काळे यांचा १२ मे २००७ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील बेकायदेशीर ताब्यात घेऊन तीन दिवस बेदम मारहाण केल्याने त्यांचा मृत्यू झाला. यावेळी सुनील रामानंद हे नगरचे पोलीस अधिक्षक होते.

पारधी समाजावरील गुन्हेगारीचा शिक्का पुसला जावा म्हणून समाजसेविका सुमन काळे यांनी मोठे कार्य केले. आत्मसमर्पण मेळावे घेऊन पारधी समाजातील अनेकांना मुख्य प्रवाहात आणले. मात्र त्यांना पोलिसांनी बेकायदेशीर ताब्यात घेऊन मरेपर्यंत मारहाण केली व पुढे पोलिसांनी सुमनने नवऱ्याच्या त्रासाला कंटाळून विष पिऊन आत्महत्या केल्याचा बनाव रचला.

मात्र १ सप्टेंबर २००७ रोजी प्राप्त ''केमिकल ऍनलायझेर'' ■ पान ४ वर

**पेट्रोल टंचाईच्या भीतीने शहरातील बहुतेक पेट्रोल पंपावर पेट्रोल डिझेल व सीएनजी गॅस भरण्यासाठी वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या**



बोलेगाव फाटा पेट्रोल पंप



एमआयडीसी पोलीस स्टेशन चौक पेट्रोल पंप



**रामनवमीच्या अहिल्यानगरमधील नागरिकांना हार्दिक शुभेच्छा!**

## बोधेगावमध्ये शॉर्ट सर्किटची भीषण आग

### तीन दुकाने जळून खाक, लाखोंचे नुकसान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शेवगाव–** शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील विकास घोरतळे यांच्या मालकीच्या शॉपिंग सेंटरमध्ये मंगळवारी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागून तीन दुकाने जळून खाक झाली. विजेच्या शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

आग लागल्याचे समजताच परिसरातील ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशामक दल वेळेवर उपलब्ध नसल्याने स्थानिक युवकांनीच पुढाकार घेत पाण्याचे टँकर आणून आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मोठ्या प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आणण्यात यश आले.



(छाया : बाबा पालवे)

या भीषण आगीत गजानन कैलास शहाणे यांचे सोन्या-चांदीचे दुकान तसेच राजेंद्र हुलजुते यांची भांडी व फर्निचरची दोन दुकाने ■ पान ४ वर

## होमगार्डचे सात लाखांचे मानधन डॉ. सुजय विखेंकडून जमा

### अहिल्यानगर भाजपाच्या वतीने उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते जिल्हाधिकारी यांना धनादेश सुपूर्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** समाजातील प्रश्नांवर तत्काळ निर्णय घेऊन प्रत्यक्ष कृतीतून शब्द पाळण्याची परंपरा जपणारे भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी नगरमनमाड राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडीच्या समस्येवर ठोस पाऊल उचलत होमगार्डचे तब्बल सुमारे सात लाख रुपयांचे मानधन स्वतःच्या पुढाकारातून जमा करून दिलेला शब्द खरा ठरवला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व वाहतूक सुरळीत राहावी यासाठी घेतलेल्या या निर्णयामुळे राहुरी परिसरातील वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या माध्यमातून नगरमनमाड राष्ट्रीय महामार्गाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. रस्त्याच्या कामामुळे अनेक ठिकाणी वाहतूक एकेरी करण्यात आली असून काही भागात डायव्हर्शन देण्यात आले होते. त्यामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती. काही ठिकाणी अपघातांची संख्या वाढत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. ही परिस्थिती लक्षात घेत डॉ. सुजय विखे पाटील यांनी जानेवारी महिन्यात स्वतः घटनास्थळी भेट देत वाहतुकीचा आढावा घेतला. या वेळी नागरिक, व्यापारी व वाहनचालकांच्या अडचणी समजून घेत त्यांनी तातडीने उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला. वाहतूक नियंत्रणासाठी होमगार्डची नियुक्ती करावी अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात आली. शासनाकडे होमगार्डच्या मानधनाची ■ पान ४ वर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वी जयंती मोठ्या उत्साहाने होणार– सुरेश बनसोडे

### आंबेडकर जयंतीपूर्वी पोलीस प्रशासनासोबत आंबेडकरी समाजाची बैठक



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** येऊ घातलेल्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वी जयंतीनिमित्त आंबेडकरी समाजाच्या वतीने पोलीस अधीक्षक यांच्यासोबत महत्त्वपूर्ण समन्वय बैठक घेण्यात आली. या बैठकीत जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर उद्भवणाऱ्या विविध अडीअडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी समाजाच्या वतीने मांडण्यात आलेल्या विविध मागण्यांवर पोलीस प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत त्यांना मान्यता देण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे यंदाची आंबेडकर जयंती उत्साहपूर्ण आणि सुरळीत पार पडण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

नगरसेवक सुरेश बनसोडे यांनी सांगितले की, यंदा आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असून सर्व कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडले जातील. तसेच मिरवणुकीदरम्यान लावण्यात येणारा डीजे शासकीय नियमांचे पालन करूनच वाजविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीमुळे आंबेडकरी समाज आणि पोलीस प्रशासन यांच्यात समन्वय साधला गेला असून जयंती उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडणार आहे यावेळी नगरसेवक सुरेश भाऊ बनसोडे, ज्येष्ठ नेते अशोकराव गायकवाड, सुमेध गायकवाड, जयंत गायकवाड, किरण दाभाडे, सुनील क्षेत्रे, विशाल गायकवाड, विलास साठे, सिद्धार्थ आढाव, भाऊ भिंगारदिवे, मुन्ना भिंगारदिवे, ■ पान ४ वर

## स्व. अरुणकाका जगताप यांचा वाडिया पार्क येथे पूर्णाकृती पुतळा उभारावा

### नगरसेवक निखिल वारे यांचे महापौर ज्योतीताई गाडे यांना निवेदन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्वर्गीय आमदार अरुणकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असताना, त्यांच्या स्मरणार्थ महानगरपालिकेमार्फत विविध उपक्रम राबविण्याची मागणी नगरसेवक निखिल वारे यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दि. २५ मार्च २०२६ रोजी



स्व. अरुणकाका जगताप यांच्या जयंतीचे औचित्य साधून शहर व उपनगरांमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्याच पार्श्वभूमीवर महानगरपालिकेनेही त्यांच्या कार्याचा गौरव राखण्यासाठी विशेष उपक्रम राबवावेत, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### पालवी शिशु विहारच्या नगरमधील पहिल्या सीबीएसई मराठी शाळेची घोषणा

अहिल्यानगर- इंग्रजी ही ज्ञान भाषा म्हणून ओळखली जात असली तरी प्रत्येक लहान मुलासाठी मातृभाषा तितकीच महत्वाची असते. मातृ भाषेतून मिळणाऱ्या शिक्षणाचे अधिक प्रभावीपणे आकलन होते. हीच बाब ओळखून विद्या भारती मान्यताप्राप्त पालवी शिशु विहार अहिल्यानगर येथील पहिली सीबीएसई मराठी शाळेच्या रूपाने समोर येत आहे. पालवी शिशु विहारच्या बालवर्ग पदवीदान समारंभात रविवार दि.२२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता या नवीन शाळेची अधिकृत घोषणा केली जाणार आहे. मनपा आयुक्त यशवंत डांगे, ज्ञान प्रबोधिनी निगडी येथील आदित्य शिंदे, मार्गदर्शक अशोक बन्सीलाल मुथा यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम होणार आहे. पालवी शिशु विहार ही संस्था मागील दहा वर्षांपासून प्री प्रायमरी क्षेत्रात कार्यरत आहे. शिक्षण क्षेत्राचा भविष्याचा वेध घेऊन संस्थेने सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन सीबीएसई मराठी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. आयकॉन पब्लिक स्कूलचे विश्वस्त अमित मुथा व इतर सहकाऱ्यांनी यासाठी मार्गदर्शन केले आहे. अहिल्या नगर येथील ही पहिलीच सीबीएसई मराठी शाळा ठरणार आहे. शासनानेही सीबीएसई मराठी शाळा धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार शुभ मंगल कार्यालय, भिडे हॉस्पिटल चौक, सावेडी नाका येथे रविवारी सदर कार्यक्रम व शाळेची घोषणा देत होणार आहे. यात बालगृह पूर्ण करून इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा पदवी दान समारंभ, पालक, शिक्षक, मुलांच्या सहभागातून म मराठीचा हा सांस्कृतिक कार्यक्रम होईल. पालवी शिशु विहार येथे सांस्कृतिक वारसा,, एकात्मता, राष्ट्र व विज्ञान या मूल्यांवर आधारित आनंददायी हसत खेळत शिक्षण दिले जाणार आहे. प्ले ग्रुप, नर्सरी, एलकेजी, युकेजी या वर्गांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. तरी पालक व विद्यार्थ्यांनी रविवारीच्या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन राजेंद्र सोनार, संजय सोनार, शरद झोटिंग, अमित मुथा, गणेश झंवर, मुग्धा घोटणकर, वैद्य अनिकेत घोटेकर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ९०११५६८५६७, ८८३०७३४६६३.

### पै. ईश्वर आण्णा गव्हाणे यांचे निधन



आष्टी : तालुक्यातील ज्येष्ठ नेते, जुन्या पिढीतील नामवंत पैलवान, वारकरी संप्रदायाचे पाईक, भारुड सम्राट, कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती हभप ईश्वर रामभाऊ गव्हाणे (वय ७८, रा. बोरोडी ता. आष्टी, जि. बीड) यांचे शुक्रवार (दि. २०) पहाटे अहिल्यानगर येथे रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी बोरोडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. मिरजगाव पोलीस ठाण्याचे पोलीस हेडकॉन्स्टेबल बापूराव गव्हाणे, माजी सरपंच प्रमोद गव्हाणे,भाजपाचे लोणी गटाचे युवा नेते जयसिंग गव्हाणे, बोरोडीचे सरपंच बाळासाहेब गव्हाणे यांचे ते वडील होत.पै. ईश्वर गव्हाणे हे आण्णा नावाने सर्वत्र परिचित होते. कुस्ती क्षेत्रात त्यांचे मोठे नाव होते. अहिल्यानगर, बीड, सोलापूर, छत्रपती संभाजी नगर, पुणे जिल्ह्यात त्यांच्या नावाचा दबदबा होता. स्व. पैलवान छबुराव लांडगे, सहादू गुंजाळ, अण्णा वामन, पै. अली चाऊस, युसुफ पैलवान, पै. रामभाऊ जगताप अशा नामवंत पैलवान बरोबर त्यांच्या कुस्त्या झाल्या होत्या. कर्जत श्रीगोंदा, पारनेर, आष्टी, जामखेड या तालुक्यामधील प्रत्येक गावामध्ये हगाम्यात अण्णांची कुस्ती झाली होती.

# धोत्रे खुर्द शाळेचे सचिन ठाणगे आयडॉल शिक्षक

## नवकल्पनाशील कार्याची राज्यभरात दखल



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्थेत सकारात्मक बदल घडवणारे शिक्षक म्हणून ओळख निर्माण केलेले पारनेर तालुक्यातील धोत्रे खुर्द जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक सचिन ठाणगे यांची राज्यस्तरावर दखल घेत आयडॉल शिक्षक म्हणून निवड झाली आहे.

शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या संकल्पनेतून उत्तम, प्रेरणादायी कार्य करणाऱ्या शिक्षकांचीआयडॉल शिक्षक म्हणून निवड केली जाते.

ठाणगे यांनी गेल्या काही वर्षांत अध्यापनात केलेली नाविन्यपूर्ण प्रयोगशीलता सर्वत्र चर्चेचा विषय ठरली आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती विकसित करणे, जीवनकौशल्यांचा विकास, मूल्याधिष्ठित शिक्षण,तसेच नव्या शैक्षणिक पद्धती व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक प्रतिभेला वाव देणारे उपक्रम आणि विद्यार्थी प्रेरक वातावरण निर्मिती या सर्व गोष्टींमुळे सचिन ठाणगे यांची निवड झाली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरातील विद्यार्थ्यांपेक्षा मागे राहू नयेत म्हणून त्यांनी सातत्याने घेतलेला मेहनतीचा ध्यास उल्लेखनीय आहे. पालकांचा सहभाग, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि शाळेची शैक्षणिक प्रगती यासाठी त्यांनी केलेले योगदान शैक्षणिक इतिहासात महत्त्वाचे मानले जात आहे.

ठाणगे यांच्या या निवडीबद्दल अहिल्यानगर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, गटशिक्षणाधिकारी तेजस्वीनी पवार,विस्तार अधिकारी चांगदेव गवळी केंद्रप्रमुख उत्तम फंड, राजेंद्र शिंदे व शिक्षणप्रेमींनी अभिनंदन करत ही निवड संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे मत व्यक्त केले आहे.

# श्रीराम जन्मोत्सव २६ मार्च रोजी नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात भक्तीमय वातावरणात साजरा होणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने गुरुवार, दि. २६ मार्च रोजी नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव अत्यंत धार्मिक विधी व उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. अयोध्येच्या धर्तीवर विविध भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे पहाटे ६ वाजता जलाभिषेक, दुग्धाभिषेक व शृंगार, सकाळी ७.३० वाजता मंगल आरती, सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत 'श्रीराम जय राम जयजय राम' नामजप व हनुमान चालीसा पठण, दुपारी १२ वाजता प्रभु श्रीरामचंद्र जन्मोत्सव सोहळा व आरती, त्यानंतर प्रसाद वितरण करण्यात येणार आहे.

भाविक भक्तांना श्रीराम लल्लाचे दर्शन लवकर व सुरळीत व्हावे यासाठी ट्रस्टच्या वतीने दर्शनबारी व मंडपाची सुयोग्य व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व कार्यक्रमांसाठी श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळाच्या वतीने सर्व अहिल्यानगरवासियांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित महा हनुमान चालीसा पाठ राजज्योती नगर मित्र मंडळ व श्री देसर्डा परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने राजज्योती नगर, आर्यन लॉनजवळ, बुरुडगाव रोड येथे रात्री ८ ते १०.३० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.

मंडळाच्या वतीने दरवर्षी श्रीराम व हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरे केले जातात. होळी पौर्णिमेपासून ३१ दिवस शहरभर विविध सार्वजनिक मंडळांच्या माध्यमातून सामूहिक महा हनुमान चालीसा पठण, भजन संध्या व त्याचा प्रसार केला जातो. गेल्या १९ वर्षांपासून हा उपक्रम अखंड सुरू असून यावर्षी प्रथमच महा हनुमान चालीसा पाठाबरोबर ''श्रीराम जय राम जयजय राम'' या तारक मंत्राचा संगीतमय सामूहिक जप करण्यात येत आहे.

प्रत्येक घराघरांत श्रीराम स्तुती व हनुमान चालीसा पोहोचावी या उद्देशाने कार्यक्रमादरम्यान मोफत हनुमान चालीसा पुस्तिकांचे वितरण करण्यात येत आहे. दररोजच्या कार्यक्रमाच्या शेवटी श्रीरामचरितमानसातील चौपाई वाचन, आरती व प्रसाद वितरण करून कार्यक्रमाचा समारोप केला जातो. या उपक्रमात मोठ्या संख्येने भाविक भक्त सहभागी होऊन भक्तिभावाने हनुमान चालीसा पठण करतात.

श्रीराम जन्मोत्सवाच्या दिवशी श्रीराम मंदिर दिवसभर दर्शनासाठी खुले राहणार आहे. तसेच गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी पहाटे ६ वाजता श्री हनुमान जन्मोत्सवही साजरा करण्यात येणार आहे.

या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखिल शेटीया यांनी केले आहे.

# अहिल्यानगरचा शौनक माणकेश्वर जर्मनीत झळकणार!

## । हॉफ विद्यापीठात 'मॅन्युफॅक्चरिंग एक्सलन्स'साठी निवड; आंतरराष्ट्रीय स्तरावर नगरचा गौरव । शैक्षणिक, क्रीडा व संशोधन क्षेत्रात दमदार कामगिरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथील चिरंजीव शौनक संतोष माणकेश्वर यांची जर्मनीमधील प्रतिष्ठित हॉफ विद्यापीठ येथे उच्च शिक्षणासाठी निवड झाली आहे. 'मॅन्युफॅक्चरिंग एक्सलन्स' या विषयात मास्टर्स करण्यासाठी त्यांना ही संधी मिळाली असून, त्यांच्या या यशामुळे अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाचा तुरा रोवला गेला आहे.

शौनक यांनी वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथून 'बॅचलर इन मेकॅनिकल टेक्नॉलॉजी' हा अभ्यासक्रम उत्कृष्ट गुणांसह पूर्ण केला. त्यांनी तीनही वर्षे 'फर्स्ट क्लास विथ डिस्टिंक्शन' मिळवत सतत गुणवत्तेत स्थान राखले. नुकत्याच झालेल्या पदवीदान समारंभात त्यांना सन्मानपूर्वक पदवी बहाल करण्यात आली तसेच त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल विशेष गौरवही करण्यात आला.

अभ्यासादरम्यान विविध नामांकित कंपन्यांकडून नोकरीच्या संधी मिळूनही शौनक यांनी वेगळा मार्ग निवडत उच्च शिक्षणाचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयाला वेल्लोर इन्स्टिट्यूटने प्रोत्साहन देत जर्मनीतील विद्यापीठाशी समन्वय साधून त्यांची निवड निश्चित केली.

हॉफ विद्यापीठात शिक्षण घेत असताना शौनक आपल्या संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण जर्मनीतील नामांकित औद्योगिक कंपन्यांमध्ये करणार आहेत. यामध्ये नेक्सन्स आणि पॅरागॉन मोवसिस यांचा समावेश आहे.

यापूर्वी त्यांनी जर्मनीतील हॅनोव्हर येथे 'नेक्सन्स' कंपनीत संशोधन सादर केले असून, तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या कामाचे विशेष कौतुक केले. हॅनोव्हर हे शहर जागतिक औद्योगिक प्रदर्शनांसाठी प्रसिद्ध असून, तेथे सादरीकरण करत शौनक यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली आहे.

शौनक यांचे शालेय शिक्षण ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूल येथे झाले, तर उच्च माध्यमिक शिक्षण त्यांनी सारडा कॉलेजमध्ये पूर्ण केले. लहानपणापासूनच गुणवत्तेत अव्वल राहणाऱ्या शौनक यांनी शैक्षणिक क्षेत्राबरोबरच क्रीडा व कला क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. फुटबॉलमध्ये त्यांनी विशेष प्राविण्य मिळवत डीएसके फुटबॉल क्लबकडून खेळताना यश मिळवले. याच कामगिरीच्या जोरावर त्यांना फुटबॉल क्लब लिव्हरपूल (इंग्लंड) या जागतिक दर्जाच्या क्लबतर्फे स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आणि त्यांनी विविध पदकेही पटकावली.

त्यांच्या यशामागे कुटुंबीयांचे मोठे योगदान आहे. आजोबा प्रा. शरदराव माणकेश्वर व आजी प्रा. शैलजा माणकेश्वर यांचे मार्गदर्शन लाभले. आई इंजिनिअर सौ. अर्चना माणकेश्वर व वडील श्री. संतोष माणकेश्वर (प्रसिद्ध ट्रेनर व व्यवस्थापकीय संचालक) यांनीही सातत्याने प्रेरणा दिली.

# माध्यमिक शिक्षक संघटनेच्या अध्यक्षपदी सचिन झगडे; सचिवपदी अमोल ठाणगे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनेची समन्वय बैठक व वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. ही सभा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या शिक्षक शिक्षकेतर भवन येथे आयोजित करण्यात आली होती. जिल्हाभरातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संघटनेच्या कार्याला पाठिंबा दर्शविला.

सभेत शिक्षक संघटनेच्या वैचारिक पायाभूत भूमिकेबद्दल माहिती देण्यात आली. शिक्षक संघटनेला टीडीएफच्या वैचारिक परंपरेचा वारसा लाभलेला असून, ही पार्श्वभूमी जपली गेल्यासच खऱ्या अर्थाने सक्षम संघटन उभे राहू शकते, असे मत ज्येष्ठ मार्गदर्शक शिवाजीराव ढाळे यांनी व्यक्त केले.

संघटनेने आजवर सातत्याने संघर्षाची भूमिका घेत शिक्षकांच्या व माध्यमिक शिक्षणाच्या प्रश्नांसाठी अविरत काम केले आहे, असे प्रतिपादन चांगदेव कडू यांनी केले. यावेळी राजेंद्र लांडे व आप्पासाहेब शिंदे यांनी समन्वयाची भूमिका मांडत, कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन शिक्षक हितासाठी लढा दिल्यासच संघटना टिकाऊ धरणार, असे मत व्यक्त केले.बैठकीचे अध्यक्ष शिरीष टेकाडे यांनी नव्या कार्यकारिणीची घोषणा केली. त्यानुसार सचिन झगडे (श्रीगोंदा) यांची अध्यक्षपदी, तर अमोल ठाणगे (पारनेर) यांची सचिवपदी निवड करण्यात आली. खजिनदारपदी अशोक सोनवणे (नेवासा) यांची निवड झाली.

उपाध्यक्षपदी भालचंद्र देशमुख (कर्जत), सचिन फटांगरे (संगमनेर), प्रसाद शिंदे (श्रीरामपूर), सोमनाथ सुंबे (नगर) व सचिन जाधव (कोपरगाव) यांची निवड करण्यात आली. सहसचिवपदी देविदास पालवे (पाथर्डी), राज जाधव (राहुरी), रावसाहेब शेळके (अकोले) व मोहन यादव (जामखेड) यांची निवड झाली. हिशोब तपासणीसाठी संतोष आडकिते (शेवगाव) व देविदास सातपुते (राहता) यांची नियुक्ती करण्यात आली.

निवड समितीतील शिवाजीराव ढाळे, चांगदेव कडू, राजेंद्र लांडे, मच्छिंद्र लगड, आप्पासाहेब शिंदे व शिरीष टेकाडे यांनी एकमताने ही कार्यकारिणी निवडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र खेडकर यांनी केले, तर सूत्रसंचालन रमजान हवालदार यांनी केले.

''ज्येष्ठ मार्गदर्शक व नवीन कार्यकारिणी यांच्या समन्वयातून संघटनेची वैचारिक बांधणी अधिक मजबूत करत शैक्षणिक व्यवस्थेतील सर्व घटकांच्या समस्या सोडवण्यावर भर देणार,'' तसेच संघटनेच्या माध्यमातून शिक्षक हितासाठी प्रभावीपणे काम केले जाणार.

–सचिन झगडे (जिल्हाध्यक्ष, अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटना)

# जय आनंद महावीर युवक मंडळातर्फे २८ मार्चला महाभोजन कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय संस्कृतीत भुकेलेल्यांना अन्न देणे आणि भगवंताच्या नामाचे स्मरण करणे या दोन गोष्टींना अतिशय महत्त्व आहे. मानवसेवेलाच ईश्वरसेवा मानून सर्वांना संस्कारांची शिदोरी देणार्या राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीनिमित्त नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाने सालाबादप्रमाणे यंदाही शनिवार दि.२८ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत अन्नदान (महाभोजन) कार्यक्रम आयोजित केला आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी दिली.

आचार्य आनंदऋषीजी महाराजांच्या शिकवणुकीप्रमाणे कार्य करणार्या जय आनंद महावीर युवक मंडळाने अनेक वर्षांपूर्वी आचार्यश्रींच्या स्मृतीदिनी अन्नदानाचा उपक्रम सुरू केला. यंदा मंडळ रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. दरवर्षी अनेकांच्या सहकार्यातून हा उपक्रम राबविला जातो. पुरीभाजी, बुंदी, मसालेभात अशा रूचकर भोजनाचा आस्वाद उपस्थित घेतात. शुध्द व थंडगार पाण्याचीही स्वतंत्र व्यवस्था केली जाते. उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेवून मंडळातर्फे नवीपेठेत खास मंडप उभारण्यात येतो. वयोवृध्द, अपंगांना खाली मांडी घालून भोजन करताना त्रास होतो हे लक्षात घेवून भोजनासाठी खास टेबल खुर्च्यांचीही व्यवस्था करण्यात येते. संपूर्ण स्वयंपाक हायजिन पध्दतीने स्वच्छता राखून होईल, याची मंडळातर्फे विशेष दक्षता घेण्यात येते. अशी माहिती मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा यांनी दिली



जय आनंद मंडळाच्या या महाभोजनाचा दरवर्षी हजारोंच्या संख्येने भाविक लाभ घेतात. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या भोजन सेवेचा लाभ आतापर्यंत लाखो भाविकांनी घेतलेला आहे. आचार्य आनंदऋषीजी महाराजांचा हा प्रसाद आहे, अशी श्रध्दा भाविकांमधून मंडळाचे कार्यकर्ते ऐकतात तेव्हा भारावून जातात. मंडळातर्फे वंचित मुलांच्या विविध संस्थांनाही प्राधान्याने भोजन पोहोच केले जाते. या कार्यक्रमासाठी मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तब्बल महिनाभर परिश्रम घेतात.

दि.२८ मार्च २०२६ ला नवीपेठमध्ये आयोजित केलेल्या या महाभोजनाचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जय आनंद महावीर युवक मंडळ रौप्य महोत्सवी वर्षाचे कार्याध्यक्ष सत्येन मुथा व मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आर्या जाधव हिने राज्याच्या गुणवत्ता यादीत पटकाविले २३ वे स्थान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** अहिल्यानगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या इलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कु. जाधव आर्या सुरज हिने हिने राज्याच्या गुणवत्ता यादीत २३ वे स्थान मिळवत शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशाबद्दल तिला प्रमाणपत्रासह २५०० रुपयांचे रोख पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे.

यंदा शाळेचा इलिमेंटरी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून १७ विद्यार्थी ए ग्रेडमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. तसेच इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल ९२ टक्के लागला असून १२ विद्यार्थी ए ग्रेडमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. शाळेच्या या सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्तेसह कला क्षेत्रातही आपली छाप सोडली आहे.

आर्या जाधव हिच्यासह गुणवंत विद्यार्थ्यांना चित्रकला शिक्षक सुनील जोर्वेकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनीने मेहनत घेत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, प्राचार्य प्रभाकर भाबड तसेच सर्व विभाग प्रमुख व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# श्रीराम हे हिंदू धर्मियांचे आदर्श- वासंतीताई उत्पात

## श्री.स्वामी समर्थ मंदिरात राम नवमीनिमित्त राम कथा प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रामनवमी म्हणजे रामाचा वाढदिवस, रामनवमी आपल्यातील दिव्य आत्म प्रकाश प्रकटीप्रित्यर्थ साजरी केली जाते. प्रभू रामचंद्र ज्याला पाहून मन रमते, आकर्षित होते, मनुष्य स्वतःला विसरून जातो, मुग्ध होतो,भारावून जातो, अशी व्यक्ती म्हणजे राम, हेच श्रीराम हिंदू धर्मियांचे आदर्श आणि लाडकं दैवत आहे.असे निरूपण राष्ट्रसेविका समिती चे वक्त्या वासंतीताई उत्पात यांनी केले.



सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात राम नवमी निमित्त श्रीराम कथेचे आयोजन स्वामी समर्थ ट्रस्ट व प्रिया जानवे यांनी केले होते.यावेळी भक्तांना निरूपण करताना वासंतीताई बोलत होत्या. यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते

त्यापुढे म्हणाल्या श्रीराम हे पितृवचन पालक, मातृभक्त,एक वचनी आणि आदर्श व्यक्तिमत्व होते.मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाचे जीवन त्यांचे कर्तव्य निष्ठा याबाबत त्यांनी सविस्तर निरूपण केले.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagwanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagwanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### पोलीस-समाज सुसंवाद वाढविण्यात सपोनि. वारुळे यांचे योगदान महत्त्वाचे ठरेल - डॉ. शिंदे



अहिल्यानगर - नगर तालुका पोलीस स्टेशनमध्ये नव्याने रुजू झालेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांचा स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते शाल व वृक्ष देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे, माजी प्राचार्य एकनाथ जगताप आदी उपस्थित होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे हे अहिल्यानगर येथील रहिवासी असून वारूळवाडी हे त्यांचे मूळ गाव आहे. यापूर्वी ते तोफखाना पोलीस स्टेशन येथे कार्यरत होते. यावेळी डॉ. उद्धव शिंदे म्हणाले की, ''पोलीस दल हे समाजाच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सपोनि. गणेश वारुळे यांच्यासारखे कर्तव्यदक्ष अधिकारी नगर तालुक्यात उत्तम कार्य करून नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करतील, अशी अपेक्षा आहे. तसेच समाज आणि पोलीस यांच्यातील सुसंवाद वाढविणेही काळाची गरज आहे.''

### आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त निमगाव वाघा येथे वृक्षारोपण

अहिल्यानगर- आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. या उपक्रमामध्ये ग्रामस्थ व युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वृक्षारोपण करुन पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. कार्यक्रमास डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, लक्ष्मण चौरे, सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, सुनील जाधव, सुभाष फलके, आशा फलके, संदीप डोंगरे, अकबर शेख, मंजाबापू गायकवाड, दीपक आंग्रे, आकाश थोरात आदी उपस्थित होते. पै. नाना डोंगरे म्हणाले की, आजच्या काळात पर्यावरणाचा समतोल मोठ्या प्रमाणात बिघडत चालला आहे. वाढते प्रदूषण, पाण्याची टंचाई आणि तापमानातील वाढ या समस्या गंभीर होत आहेत. या सर्वांवर उपाय म्हणून वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन अत्यंत गरजेचे आहे. आपण फक्त झाडे लावून थांबता कामा नये, तर त्यांचे संगोपन करणे ही आपली जबाबदारी आहे. एक झाड म्हणजे जीवनाचा आधार आहे. प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प केला, तर पर्यावरणाचा समतोल राखला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### कनिष्ठ अभियंत्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप

अहिल्यानगर - जिल्हा परिषद, अहिल्यानगर सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता यांच्यावर बिले मंजूर करताना अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहे. नुकतेच लाज घेताना गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांच्या कामांची सखोल चौकशी करून शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.या संदर्भातील निवेदन समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी नाशिक विभागीय आयुक्त तसेच जिल्हा परिषद प्रशासनाला दिले आहे. निवेदनात म्हंटले आहे की, सार्वजनिक बांधकाम उपविभागातील कनिष्ठ अभियंता तथा अतिरिक्त पदभार उपअभियंता म्हणून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याने दि. २३ मार्च रोजी मौजे देहरे येथील दत्त मंदिर स्मशानभूमी सुशोभीकरणाच्या ८ लाख २२ हजार २०६ रुपयांच्या कामाचे बिल मंजूर केले.

## बलात्कारातील आरोपीला तात्काळ अटक न झाल्यास पीडित महिलेचा आत्मदहनाचा इशारा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी


**अहिल्यानगर–** बलात्कार प्रकरणातील आरोपी अभिषेक कळमकर याला तात्काळ अटक करण्यात यावी, अन्यथा आत्मदहनाचा इशारा पीडित महिला रेणुका दत्तात्रय गिरी यांनी पोलीस प्रशासनाकडे निवेदन सादर केले आहे. सदर निवेदनात नमूद केल्यानुसार, २९ फेब्रुवारी २०२६ रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३७६, ३५४ (एम) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडितेच्या म्हणण्यानुसार, आरोपी अभिषेक कळमकर याने जबरदस्तीने अत्याचार करत तिचा व्हिडिओ तयार करून धमकावत अश्लील कृत्ये करण्यास भाग पाडले.

तक्रार दाखल होऊनही अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. उलट आरोपी सध्या फरार असून त्याच्याकडून पीडितेला व तिच्या कुटुंबीयांना गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

याबाबत पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करून आरोपीला अटक करावी, अशी मागणी करत, अन्यथा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशाराही पीडितेकडून देण्यात आला आहे.

## आचार्य आनंदऋषी स्मृतीदिनी पशुवैद्यकीय सेवा व इतर समाजहिताचे कार्यक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या स्मृतीदिनानिमित्त जायंट्स ग्रुप व पशुवैद्यकीय चिकित्सालय यांच्या संयुक्त विद्यमाने २८ मार्च () सकाळी १० ते १ वाजेपर्यंत स्टेशनरोडवरील पशु वैद्यकीय चिकित्सालय येथे मोफत आरोग्य तपासणी, उपचार शिबीर आयोजित करण्यात आले आहे, ज्यात जनावरांना अँटी-रेबीज लस व जंतप्रतिबंधक औषधे मोफत दिली जाणार आहेत, तरी पशुपालकांनी याचा लाभ घ्यावा असे जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन चे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे व सहाय्यक आयुक्त जिल्हा पशुसंवर्धन चे डॉ. मुकुंद राजळे यांनी सांगितले.

तसेच पांजरपोळ संस्थेत चारावाटप, महानुभव आश्रम येथे वृक्षरोपण, होईल. आनंदधाम येथील रक्तदान शिबिरात जायंट्सचे अनेक सदस्य सहभागी होतील, असे अध्यक्ष राजेंद्र कटारिया व सचिव अमित मुनोत यांनी सांगितले.

# गरजूंना मदत हीच खरी स्वर्गीय अरुण काका यांना आदरांजली – अविनाश घुले

### माजी आमदार स्व. अरुण काका जगताप जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम; मूकबधिर विद्यार्थ्यांना चटई वाटप, बाबावाडीत अन्नदान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** माजी आमदार स्वर्गीय अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त प्रभाग क्रमांक १३ मधील सर्व नगरसेवकांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मूकबधिर विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना चटईचे वाटप करण्यात आले, तर बाबावाडी परिसरात मिष्ठान्न भोजनाचे आयोजन करून गरजू नागरिकांना अन्नदान करण्यात आले. या उपक्रमांमुळे जयंती साधेपणाने पण सामाजिक बांधिलकी जपत साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास नगरसेवक अविनाश घुले, सुरेश बनसोडे, विपुल शेटिया ,गोरख पडोळे ,चेतन्य घुले ,सोनू ओटी ,राहुल आल्हाट ,वैभव ओटी ,प्रणव पडोळे ,सचिन वाघ ,तबाजी कार्ले ,अर्जुन शिंदे आदी उपस्थित होते. मूकबधिर विद्यालयात विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजांचा विचार करून चटई व इतर आवश्यक वस्तूंचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये यावेळी आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच बाबावाडी येथे आयोजित अन्नदान उपक्रमात अनेक नागरिकांनी सहभाग घेतला.

यावेळी बोलताना नगरसेवक अविनाश घुले म्हणाले की, स्वर्गीय आमदार अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त



प्रभागातील सामाजिक संस्था व गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याचा आमचा प्रयत्न आहे. जयंतीनिमित्त गरजूंसाठी ज्या वस्तू त्यांना लागतात त्या देण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, त्या माध्यमातून मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

ते पुढे म्हणाले की, आम्ही चारही नगरसेवकांच्या वतीने चटई व इतर उपयुक्त वस्तूंचे वाटप करून जयंती वेगळ्या पद्धतीने साजरी करण्याचा प्रयत्न केला आहे. स्वर्गीय अरुण काका जगताप यांच्या विचारांनुसार समाजातील वंचित घटकांसाठी काम करणे हीच खरी त्यांना आदरांजली आहे. त्यांच्या प्रेरणेतूनच भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल.

बाबावाडी येथे आयोजित अन्नदान उपक्रमाबाबतही घुले यांनी सांगितले की, समाजातील गरजू घटकांना आधार देणे ही काळाची गरज आहे. या जयंतीनिमित्त अन्नदानासारख्या उपक्रमातून अनेकांना दिलासा मिळावा, हा आमचा उद्देश असून अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो.

दरम्यान, स्व. अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमांचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. सामाजिक जाणीव ठेवून साधेपणाने जयंती साजरी करण्याचा हा आदर्श उपक्रम असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

## कोहिनुर मॉल, आयोजित व अनाहत एक कलासृष्टी प्रस्तुत चैत्र उत्सव कार्यक्रमास उदंड प्रतिसाद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** मराठी अस्मितेचा आणि संस्कृतीचा जागर या संकल्पनेवर आधारित गुढीपाडवा आणि रामनवमीच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि. २२ मार्च २०२६ रोजी कोहिनुर मॉल येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमात अंजली नृत्यालय वैष्णवी कुलकर्णी प्रस्तुत रामस्तुती आणि खेळ मांडीयेला वाळवंटी घाई या विद्यार्थ्यांच्या नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली.अनाहतच्या वतीने सौ. अनुजा कुलकर्णी, सौ. श्रेया सुवर्णपाठकी, सौ. अमृता बेडेकर,श्री. सौरभ साठे, कु. गायत्री धनलगडे, आनंद कुलकर्णी, अंबरीश जहागीरदार यांनी अभंग, भक्तीगीत, गौळण या गीतप्रकारांचे सादरीकरण केले.

मल्लखांब आणि रिदम योगा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. अहिल्यानगरची नवोदित गायिका कु. आरोही बेडेकर हिने छत्रपती शिवाजी महाराजांचे गीत,अधिर मन झाले, मदन मंजिरी ही गाणी अत्यंत सुंदर सादर केले. तसेच स्वरोह म संगीत अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र गीत व ही मायभूमी ही गाणी सादर केली. चित्रकूट स्कूल व श्री संकट मोचन हनुमान सत्संग मंडळ यांच्या वतीने सामूहिक हनुमान चालीसाचे सादरीकरण अतिशय भक्तीमय वातावरणात केले. प्रभू श्रीरामांच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली. अतिशय भक्तीमय वातावरणात संपन्न झालेल्या कार्यक्रमाला नगरकर रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कोहिनुर मॉल द्वारे संपूर्ण वर्षभर विविध सण उत्सवानिमित्त सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.या कार्यक्रमाला कोहिनुर मॉलच्या संचालिका सौ. श्वेता गांधी, चित्रकूट स्कूलचे संचालक श्री. अशोक सचदेव, अनाहतचे प्रसाद सुवर्णपाठकी,अविनाश शिरापुरी, संदीप कुलकर्णी, ओंकार देऊळगावकर, अंकित पवार, दीप्ती गुंदेचा, अमित डोंगरे आदी मान्यवर, विद्यार्थी पालक आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठा सोयरीक संस्थेचे नाशिक, नगर व पुणे जिल्ह्यात मोफत आधुनिक वधु वर मेळावे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जगदंब फाउंडेशन संचलित मराठा सोयरीक संस्थेचे नेहमीप्रमाणे नाशिक, नगर व पुणे जिल्ह्यात मोफत वधू वर मेळावे आयोजित करण्यात आलेले आहेत. अखिल भारतीय मराठा महासंघ नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक शहरात गंगापूर रोड येथे रावसाहेब थोरात सभागृहात रविवार दिनांक २९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता १०५ वा मोफत मेळावा आहे. १०६ वा मोफत वधू वर मेळावा राहाता तालुक्यात लोणी येथे वरद विनायक सांस्कृतिक भवनात मंगळवार दिनांक ३१ मार्च रोजी सकाळी ११ वाजता तर १०७ वा मेळावा शिरूर तालुका मित्र परिवार पुणेच्या मदतीने पुण्यात चंदननगर मध्ये एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात होणार असल्याची माहिती जगदंब फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे पाटील व संस्थेच्या संचालिका जयश्री अशोक कुटे यांनी दिली आहे. राहाता तालुक्यातील मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून मा. ना. सौ.शालिनीताई विखे मॅडम व ह. भ.प. उद्धव महाराज मंडलिक हे असणार आहेत.

मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे ज्या मुली स्वतः हजर असतील त्या मुलींना मोफत स्थळे संस्थेकडून सुचवले जातील. तसेच मेळाव्यात भव्य अशा स्क्रीनवर मुला-मुलींचे चांगले फोटो बायोडाटा दाखवले जातील. अधिक माहितीसाठी ७०२०२८१२८२ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन अ. भा. मराठा महासंघ नाशिकचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बनकर, नगरसेवक प्रवीण जाधव, नगरसेवक सागर लामखेडे, ऍड गौरव गाजरे, योगेश पाटील, वैभव वडजे, सामाजिक कार्यकर्ते बाळा पऱ्हाड, राहाता तालुक्यातील प्रकाश जोंधळे, संदीप गावडे, माणिक धनवटे, सचिन निर्मळ, वसंत पाटील, जयराम धांडे, नानासाहेब दानवे यांनी केले आहे.

मराठा सोयरीक संस्था ही महाराष्ट्रातील नामांकित अशी विवाह संस्था आहे, मेळाव्यात येताना वधू-वरांनी बायोडाटा आधार कार्ड झेरॉक्स घेऊन पालकांसह हजर राहणं बंधनकारक आहे. जे मेळाव्याला येऊ शकत नाही त्यांनी दिलेल्या नंबरवर संपर्क करून स्थळांची माहिती घेऊ शकता, असे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना करिअर आणि रोजगाराच्या संधीबद्दल मार्गदर्शन

### भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये मासूम संस्थेचा उपक्रम । दिवसभर काम करून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळाली नवी दिशा व प्रोत्साहन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शिक्षणानंतर करिअरच्या विविध वाटा आणि रोजगाराच्या संधी याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे मासूम संस्थेच्या माध्यमातून मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसा विविध ठिकाणी काम करून रात्री शिक्षण घेणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना समाजात सक्षमपणे उभे करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाला इयत्ता ८ वी ते १२ वीतील आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रात्रशाळेच्या चेअरमन ज्योतीताई कुलकर्णी होत्या. यावेळी मासूम संस्थेच्या सीनियर प्रोग्राम मॅनेजर गजाला शेख, प्लेसमेंट ऑफिसर अनुराधा पवार, इंडियन फॅशन अकॅडमीच्या संचलिका रचना काकडे, प्राचार्य व मासूम संस्थेचे सल्लागार सदस्य सुनिल सुसरे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

ज्योतीताई कुलकर्णी म्हणाल्या की, रात्रशाळेतील विद्यार्थी हे खऱ्या अर्थाने जिद्दीने मेहनत करत आहेत परंतु कौशल्याचे प्रमाणपत्र नसल्याने मेहनतीचे योग्य मानधन मिळत नसल्याने त्यांना कौशल्य व कौशल्याच्या प्रमाणपत्राचे महत्त्व सांगितले. दिवसभर काम करूनही शिक्षण घेण्याची त्यांची चिकाटी प्रेरणादायी आहे. अशा विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाले तर ते नक्कीच आयुष्यात मोठे यश मिळवू शकतात. हा उपक्रम त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात प्राचार्य सुनिल सुसरे यांनी ''रात्रशाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांना आयुष्यात उभे राहण्यासाठी दिशा देणारे केंद्र आहे. शिक्षणासोबतच कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी यांची माहिती मिळणे आजच्या काळाची गरज आहे. त्यामुळे अशा मार्गदर्शन उपक्रमांचे महत्त्व अधिक असल्याचे ते म्हणाले.

गजाला शेख म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षणावर न थांबता विविध कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. आजच्या स्पर्धात्मक युगात व्यावसायिक प्रशिक्षण, डिजिटल कौशल्ये आणि आत्मविश्वास या गोष्टी यशासाठी अत्यंत आवश्यक आहेत. मासूम संस्था विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व शिष्यवृत्तीच्या माध्यमातून पुढे जाण्याची संधी देत असल्याचे स्पष्ट केले. अनुराधा पवार यांनी ''प्रशिक्षणानंतर रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतात. योग्य मार्गदर्शन, कौशल्य आणि सातत्य याच्या जोरावर विद्यार्थी नोकरी तसेच स्वयंरोजगाराच्या क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात. विद्यार्थ्यांनी संधी ओळखून त्याचा योग्य वापर करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण, शासकीय योजना, तसेच रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मासूम संस्थेच्यावतीने दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

या उपक्रमास संस्थेच्या संचालिका निकिता केतकर, डायरेक्टर युवराज बोऱ्हाडे, कमलाकर माने, करिअर सेल प्रमुख स्नेहल ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, मानद सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजित बोरा, अनंत फडणीस, डॉ. रमेश झरकर, डॉ.पारस कोठारी आदी मान्यवरांनी उपक्रमाचे कौतुक केले.

## मृत्यूच्या दारातून खेचून आणलं! सखुबाई झारगड यांचा थरारक पराक्रम

### ६ वर्षांच्या बालकाला देत दिलं जीवदान । सखुबाई झारगड ठरल्या देवदूत! अपघातात जखमी बालकाला सीपीआर देऊन जीवदान; सखुबाई झारगड यांचे धाडस

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** भीषण अपघात, अंगावर पेटलेली आग, रक्ताने माखलेले हात आणि जीवासाठी धडपड अशा अंगावर काटा आणणाऱ्या प्रसंगात नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य सखुबाई झारगड यांनी दाखवलेल्या धाडसामुळे सहा वर्षांच्या बालकाला अक्षरशः मृत्यूच्या दारातून परत आणण्यात यश आले.

तेलवाडी परिसरात जात असताना झारगड यांना रस्त्यावर अपघातग्रस्त दृश्य दिसले. एका लहान मुलाच्या अंगावर आग लागलेली होती. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी धाडसाने पुढे होत मुलाच्या अंगावरील आग विझवली. मात्र तोपर्यंत मुलगा पूर्णपणे बेशुद्ध झाला होता आणि त्याचा श्वासही थांबलेला होता. परिस्थितीचे गांभीर्य ओळखत त्यांनी तत्काळ मुलाला आईकडून घेतले आणि त्याला सीपीआर () देण्यास सुरुवात केली. काही मिनिटांच्या अथक प्रयत्नांनंतर मुलाचा श्वास पुन्हा सुरू झाला. उपस्थितांनी सुटकेचा निःश्वास सोडला. त्यानंतर मुलाला तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. या दरम्यान झारगड यांच्या हाताला चटके बसूनही त्यांनी वेदना न जुमानता आपली जबाबदारी पार



पाडली. घटनास्थळी इतर दोन जखमींनाही डोक्याला गंभीर दुखापत झाली होती; त्यांचीही त्यांनी प्राथमिक तपासणी केली. दरम्यान, या भीषण घटनेचा परिणाम त्यांच्या सोबत असलेल्या लहान मुलीवरही झाला असून ती काही दिवस अत्यंत घाबरलेल्या अवस्थेत होती.

विशेष म्हणजे, इतका मोठा पराक्रम करूनही झारगड यांनी प्रसिद्धीपासून दूर राहणे पसंत केले. ''हे मी नावासाठी नाही, तर माणुसकीच्या नात्याने केले,'' असे त्या नम्रपणे म्हणाल्या.

या घटनेनंतर परिसरात सखुबाई झारगड यांच्या धाडसाचे आणि मानवतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आनंददरीत घुमला 'सेतू बांधा रे सागरी'चा गजर

## श्रीरामनवमी व ट्रेकॅम्पच्या वर्धापनदिनानिमित्त रंगला भरतनाट्यम नृत्याविष्कार





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रभू श्रीरामांच्या वास्तवाने पावन झालेल्या भूमीतील डोंगर-दरीचा परिसर. कानावर पडणारा श्रीरामस्तुतीची गीते... त्या गीतांवर भल्या सकाळी भरतनाट्यमचा नृत्याविष्कार करणार्या तरुणी... आणि या सुमधूर कलाविष्काराला उत्स्फूर्त दाद देणारे शेकडो निसर्गप्रेमी अशा भारावलेल्या वातावरणात नगरजवळील डोंगरगणच्या आनंददरीचा परिसर पूर्णपणे भारावून गेला होता. श्रीरामनवमी आणि ट्रेकॅम्प गिर्यारोहण संस्थेच्या १३ व्या वर्धापनदिनिमित्त आयोजित आनंददरी येथील ट्रेकने पर्यटकांना अनोखी सांगितिक मेजवाणी मिळाली.

नगरमधील मानसोपचार तज्ज्ञ असलेल्या विशाल लाहोटी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या ट्रेकॅम्प संस्थेला १३ वर्षे पूर्ण झाली. सह्याद्रीच्या डोंगररांगांतील अनेक गडकिल्ले, पर्यटनस्थळांवर जाऊन निसर्गाचा आनंद घेण्याच्या सवयीतून या संस्थेचा जन्म झाला. हजारो नगरकरांना या संस्थेने ट्रेकची सवय लावली. या संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त श्रीरामनवमीचे औचित्य साधून श्रीरामांचे वास्तव्य असलेल्या डोंगरगण परिसरातील आनंददरी येथे ट्रेकचे आयोजन करण्यात आले होते. नगरमधून सुमारे ३०० पर्यटक भल्या पहाटे वांबोरी घाटाखालील गणपती मंदिराजवळ पोहोचले. तेथून डोंगर-दरीतून चालत आनंददरीतील तलावाजवळ पोहोचले. तेथे पोहोचल्यानंतर या सर्व निसर्गप्रेमींना सुखद धक्का बसला. तेथे तलावाच्या काठी पारंपारिक वेशभूषेत श्रीरामप्रभूंच्या स्तुतीच्या गीतांवर भरतनाट्यमच्या नृत्याविष्काराने उपस्थितांना अवाक् केले. तलाव, मागे डोंगर, झाडंझुडपं अशा निसर्गरम्य परिसरात सुरेखा डावरे यांच्या मार्गदर्शनाखाली अंजली नृत्यलयाच्या संस्कृती धुमाळ, अस्मिता दोडे, श्रुती ढोकणे, अस्मी चावक आणि करिश्मा कोठारी-जोशी यांनी अतिशय सुंदर पद्धतीने गीत रामायणातील 'सेतू बांधा रे सागरी' तसेच 'रामाष्टकम, 'रामरक्षा स्तोत्र' यावर मनमोहक नृत्य सादर केले. नृत्यविशारद पदवीधारक करिश्मा कोठारी-जोशी हिने लतादीदींच्या आवाजातील वात्सल्य भावातील 'ठुमक चलत रामचंद्र...' यावर भावपूर्ण नृत्य सादरीकरण केले. टाळ्यांच्या कडकडाट व जय श्रीरामच्या जयघोषाने परिसर दणाणून गेला होता. लक्ष्मणाचं पात्र प्रतिभा महामिने यांनी साकारले. हनुमानाच्या भूमिकेत शौर्य कुटे आणि वानर वेषभूषेतील ६ वर्षांच्या पिहू जोशी हिने आपापली जबाबदारी उत्कष्टपणे पार पाडली. या पात्रांमुळे कार्यक्रमात रंगत आणली. आलेल्या सर्वांनी याचा मनापासून आस्वाद घेतला. नंतर सर्वांनी या कलाकारांबरोबर फोटो काढले. चुलीवरची कॉफी आणि भेळचा आस्वाद घेऊन ट्रेकची सांगता झाली.

डोंगरगण येथे श्रीरामांचे वास्तव्य होते. अशा पावन भूमीत श्रीरामनवमीच्या निमित्ताने भल्या पहाटे अंजली नृत्यालयाच्या उत्साही कलाकारांनी ट्रेकमध्ये सादर केलेला भरतनाट्यम् नृत्याविष्कार उपस्थित पर्यटकांना भावला. ट्रेकॅम्प नेहमीच कला, संस्कृतीचे पावित्र्य जतन व पर्यटनातून निसर्ग संवर्धन यासाठी गेल्या १३ वर्षांपासून कार्यरत आहे.

– विशाल लाहोटी, संस्थापक, ट्रेकॅम्प

भगवान महावीर व्याख्यानमाला – पुष्प तिसरे

# आपल्या संस्कृतीची, समाजाची नाळ तुटू न देता समाज परिवर्तनात महिलांचे लक्षवेधी योगदान – क्षिप्रा मानकर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** प्राचीन, अर्वाचीन, मध्ययुगीन कालखंडाचे चिंतन करता समाज परिवर्तनात महिलांची भूमिका महत्त्वाची असल्याचे कौतुकास्पद वास्तव समोर येते, असे सुप्रसिद्ध निवेदिका क्षिप्रा मानकर (अमरावती) यांनी मोठ्या अभिमानाने सांगितले.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट पू.श्री.आनंदऋषीजी महाराजांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे पूज्य आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफताना समाज परिवर्तनात महिलांची भूमिका या विषयावर त्या बोलत होत्या. सिमा मुनोत यांनी स्वागत केले. प्रा.प्रसाद बेडेकर यांनी परिचय करून दिला. डॉ.मृदुल मुनोत यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सिमरन मुनोत, राहुल मुनोत, सुरेश कटारिया, संतोष गांधी आदी उपस्थित होते. सपना कटारिया यांनी आभार मानले. विजयकुमारजी मुनोत यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या या व्याख्यानमालेच्या मुख्य प्रायोजक श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला) आहेत.

क्षिप्रा मानकर पुढे म्हणाल्या, गार्गी-मैत्रेयी यांनी सखोल ज्ञानाच्या आधारे स्वतःला सिद्ध करण्याची कला प्राप्त केली होती. राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई, अहिल्यादेवी, येसूबाई, रमाई, ताराबाई, आनंदीबाई या कर्तृत्ववान महिलांनी समाज परिवर्तनात लक्षवेधी योगदान दिले. स्त्री आणि पुरुष ही संसाराची दोन्हीही चाके मजबूत असणे गरजेचे असते.

ज्या मातीत आपण जन्मलो ती माती आणि ज्या घरात आपण गेलो त्या घराची नाती जपण्याचे कार्य स्त्री निष्ठेने करते. स्त्री नवनिर्मितीचे प्रतीक आहे. सुंदर, सशक्त, समाज निर्माण करण्यात स्त्रीचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. सृजनाची निर्मिती करणारी स्त्री समाज परिवर्तनात खंबीर भूमिका बजावताना दिसते. तुमचे-माझे पृथ्वीतलावरील अस्तित्व ज्या मातेच्या गर्भातून उदयाला येते त्या माते प्रती प्रामाणिकपणे, कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले कर्तव्यच होय. ज्ञानोबांनाही माऊली म्हणवून घेण्याचा मोह आवरला नाही, अशी ताकद माऊली शब्दात आहे.

समाजाची उन्नती आणि राष्ट्राची उन्नती करण्यात स्त्री अग्रेसर असल्याचे दिसून येते. समानतेच्या अधिकारामुळे स्त्री स्वतंत्रपणे बोलू लागली. लिहू लागली. अभिव्यक्त होऊ लागली. सामाजिक परिवर्तनाच्या लढाईत स्वतःला झोकून देऊन कर्तुत्व गाजवू लागली. शारीरिक सौंदर्य कालांतराने नष्ट होते. सद् गुणांचे सौंदर्य जीवनभर सोबत करते, हे स्त्रीला माहित असल्यामुळे ती अंगभूत कलागुण फुलवू लागली आहे. स्त्रीने आपल्या कार्यातून सातत्याने आदर्श उभे केले आहेत. जेथे जेथे स्त्री भूमिका निभावण्यास उभी टाकते तेथे तेथे परिवर्तन घडताना दिसते.

पुरुषांनी महिलांना सन्मानाने पुढे करताना पाठीशी खंबीर उभे राहण्याचा घेतलेला निर्णय निश्चितच कौतुकास्पद आहे. बदलत्या काळात होणाऱ्या समाज परिवर्तनात महिला महत्त्वाची भूमिका बजावताना दिसत आहेत. आपल्या संस्कृतीची, आपल्या समाजाची, आपल्या धर्माची नाळ तुटू न देता त्या कार्यरत आहेत, हे निश्चितच कौतुकास्पद होय, असे क्षिप्रा मानकर यांनी सांगितले.

# नगरमध्ये २८ मार्चला प्रसिद्ध संगीतकार राम शंकर व इंडियन आयडॉल फेम स्नेहा शंकर यांची भक्तीसंध्या





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीनिमित्त जैन सोशल फेडरेशनच्यावतीने व प्रबुद्ध विचारक पूज्य आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने दि.२८ मार्च २०२६ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत २८ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता आनंदधाम येथे भक्ती संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक संगीतकार राम शंकर व त्यांची कन्या, कइंडियन आयडॉल फेम सुप्रसिध्द गायिका स्नेहा शंकर आपल्या सुरेल आवाजात भक्तीगीते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध करणार आहे. इंडियन आयडॉल सिझन १५ मध्ये स्नेहा शंकर हिला उपविजेतेपद मिळवले होते.

स्नेहा शंकर जगप्रसिद्ध सूफी गायक जोडी शंकर-शंभू यांच्यातील शंका यांच नात तर संगीतकार, गायक राम शंकर यांची मुलगी आहे. वयाच्या तिसऱ्या वर्षापासून ती गायनाचा सराव करत आहे. झी टिव्ही वरील एशियाज सिंगिंग सुपरस्टार रिअलिटी शो मध्ये तिने सर्वात कमी वयात विजेतेपद पटकावले होते. नामकरण, मेरी दुर्गा, एक दुजे के वास्ते अशा अनेक गाजलेल्या टिव्ही सिरियलचे टायटल ट्रॅक तिने गायले आहेत. फॅनी खान, दम लगाके हैयशा, हनुमान द दमदार अशा अनेक हिंदी चित्रपटांत तिने पार्श्वगायन केले आहे. अहिल्या नगर येथे प्रथमच तिचा लाईव्ह शो होत आहे. सोनू निगम, हरिहरन, श्रेया घोषाल अशा दिग्गजांना साथ संगत देणारे वाद्यवृंद कलाकार नगरमध्ये सादरीकरण करणार आहेत.

स्नेहा शंकर हिचा जादूई आवाज देशभरातील रसिकांच्या पसंतीस उतरला आहे. आचार्यश्रींच्या पुण्यस्मृतीनिमित्त नगरकरांना स्नेहा शंकर यांचे लाईव्ह कार्यक्रमातील सुरेल गायन ऐकता येणार आहे. या कार्यक्रमासाठी रसिक नगरकरांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन जैन सोशल फेडरेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# गणगौर उत्सवातून पारंपरिक राजस्थानी संस्कृतींचे जतन - छायाताई फिरोदिया

## शहरात लोडी समाजातर्फे गण गौर विवाह सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** गृहिणीच्या रूपात असलेल्या गौरीचे स्मरण करत साजरा होणारा गण-गौर अर्थात शिव पार्वती विवाह सोहळा हा गृहिणीपणाचा, गृहिणींचा सन्मान करणारा उत्सव आहे. यात पारंपरिक राजस्थानी संस्कृतींचे जतन होते, असे प्रतिपादन सहेली ग्रुपच्या श्रीमती छायाताई फिरोदिया यांनी केले.

शहरातील लोडी साजन समाजातर्फे केशरगुलाब मंगल कार्यालयात गणगौर अर्थात शिव पार्वती विवाह सोहळा पारंपरिक पद्धतीने उत्साहपूर्ण व भक्तिपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या. जैन ओसवाल पंचायत सभा, जय आनंद महावीर युवक मंडळ व सहेली ग्रुपच्यावतीने या गण-गौर सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सौ. सपना मनिष गुगळे, सौ. चैताली वर्धमान पितळे सौ. तेजस्विनी प्रणव बोगावत, सौ. आश्लेषा गौरव गांधी या दाम्पत्याच्या हस्ते गण गौरची विधीवत पूजा करण्यात आली. यावेळी सहेली ग्रुपच्या श्रीमती आशाताई फिरोदिया, रिंकू फिरोदिया, आशा ईश्वर मुनोत, आशा सुरेश मुनोत, जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, ओसवाल पंचायत सभेचे सहसेक्रेटरी संतोष गांधी, बाळासाहेब भंडारी, ॲड. विजय मुथा, नितीन शिंगवी, प्रशांत मुथा, अतुल शिंगवी, मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, कार्याध्यक्ष सत्येन मुथा आदी उपस्थित उपस्थित होते.

गण-गौरची भव्य वरात काढण्यात आली. बँड पथक, पारंपारिक वेशभूषा केलेल्या व डोक्यावर शिवपार्वतीची मूर्ती घेतलेल्या महिला यात सहभागी झाल्या होत्या. राजस्थानी नृत्य सादर करत महिलांनी वरातीचा आनंद लुटला. केशर गुलाब मंगल कार्यालयात मोठ्या थाटात शिव पार्वती विवाह सोहळा संपन्न झाला. पहिल्या दिवशी फळतीज पूजा भक्तिपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सौ.पुष्पा ललित बनभेरु यांनी सर्व पूजेची व्यवस्था पाहिली. वेदमूर्ती चकोर मुळे गुरुजी यांनी पूजाविधी केला.

गणगौर व्रत उत्तर भारतात गुढी पाडव्याच्या पर्वात साजरे केले जाते. या व्रताने पतीची कृपा आपल्यावर रहाते आणि कुमारिकांना चांगला पती मिळतो, अशी श्रध्दा आहे. याचदिवशी शंकराने पार्वतीला आणि पार्वतीने समस्त स्त्री जातीला सौभाग्य बहाल केले होते. सुवासिनी हे व्रत घेण्यापूर्वी गौरीची स्थापना करतात व त्यांचे पूजन करतात. त्यानंतर गौरीची कथा सांगितली जाते.

छायाताई फिरोदिया पुढे म्हणाल्या, राजस्थानी संस्कृतीत गणगौर उत्सवाला मोठी परंपरा आहे. नगरमध्येही गणगौर सारखा पारंपरिक सण दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा करून महिला पुढच्या पिढीपर्यंत ही परंपरा पोहचवण्याची कामगिरी श्रध्देने बजावत आहेत. यानिमित्त सर्वजणी एकत्र येवून एकमेकींशी संवाद साधून सणाचा आनंद लुटतात. यावर्षी चांगला उत्साह पहायला मिळाला.

आशा मुनोत म्हणाल्या, जैन ओसवाल पंचायत आणि जय आनंद महावीर युवक मंडळाने सण उत्सव एकत्रित साजरे करून महिलांना एकत्र आणण्याची परंपरा सुरू केली आहे. शैलेश मुनोत म्हणाले, गण गौर विवाह सोहळ्यात महिला व युवती दरवर्षी आवर्जून सहभागी होतात. अशा उपक्रमांतूनच पूर्वापार चालत असलेल्या परंपरांचे जतन होते हे महत्वाचे आहे.

जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली जैन ओसवाल पंचायत सभा, जय आनंद महावीर युवक महिला मंडळ व सहेली ग्रुपच्या सर्व सदस्यांनी या सोहळ्यासाठी अथक परिश्रम घेतले. या सोहळ्यामध्ये शहराच्या विविध भागामधील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फौंडेशनतर्फे स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती त्यांचे व् केशर गुलाब मंगल कार्यालय उपलब्ध करून दिल्याबद्दल किशोर हस्तीमलजी मुनोत (नेवासकर) परिवाराचे आयोजकांच्यावतीने आभार मानण्यात आले.

(पान १ वरून)

## सुमन काळे मृत्यूप्रकरण पुन्हा चिघळणार

रिपोर्टनुसार सुमनच्या शरीरात विष नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच ८ जानेवारी २००८ रोजी तत्कालीन उपविभागीय दंडाधिकारी विकास पानसरे यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालात सुमन काळेवर पोलिसांनी केलेल्या मारहाण आणि गंभीर अत्याचाराची सविस्तर माहिती दिली. हा अहवाल वाचला तरी सुमन काळे यांच्या मृत्यूमध्ये आणि नंतर दाखल केलेल्या आत्महत्येच्या खोट्या गुन्ह्यात रामानंद यांची अत्यंत संशयास्पद भूमिका स्पष्ट होते. सुमन काळेंना मरे पर्यंत मारहाण करणारे पोलीस हे थेट रामानंद यांच्या हाता खाली काम करीत होते. म्हणून रामानंद यांच्यासह मारहाण करणाऱ्या सर्व पोलिसांवर गुन्हा दाखल करावा अशी सुमन काळे कुटुंबीयांची मागणी होती.

दरम्यान सुमन काळे पोलीस कोठडी मृत्यू प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग म्हणजेच सी आय डी कडे वर्ग करण्यात आला. तरीही कोणतीच ठोस कारवाई होत नव्हती. सुमन काळे कुटुंबाला उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागली. उच्च न्यायालयाने हस्तक्षेप केल्यानंतर सी आय डी ने सुमन काळेच्या मृत्यूसाठी सात पोलिस व एक खाजगी डॉक्टर विरोधात गुन्हा दाखल केला. मात्र सी आय डी ने आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल न करता आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे कलम लावले.

तसेच सी आय डी ने जाणीवपूर्वक रामानंद यांना आरोपी करण्याचे टाळले असे सुमन काळे कुटुंबियांचे आरोप आहेत. आज हेच रामानंद सी आय डी चे प्रमुख (अप्पर पोलीस महासंचालक) असल्याने, संशयित स्वतःच तपासाचे प्रमुख झाल्याची अजब व अन्यायकारक परिस्थिती निर्माण झाली आहे.

१३ जानेवारी २०२१ रोजी उच्च न्यायालयाने ट्रायल कोर्टाला खून झाले बाबत पुरावे आरोप निश्तिच्यावेळी गृहीत धरता येतील असे आदेश दिले. तसेच सहा महिन्यात खटला संपवावा व पीडित कुटुंबाला पाच लाख रुपये भरपाई देणेबाबतही उच्च न्यायालयाने आदेश दिले. परंतु अद्याप अहमदनगर येथील न्यायालयासमोर अजूनही प्रलंबितच आहे. इतकेच नव्हे तर सीआयडी ने गांभीर्याने कामकाज न केल्याने या गुन्ह्यातील एक महत्वाचा आरोपी (खाजगी डॉक्टर दीपक) याला उच्च न्यायालयाने डिस्चार्ज केले. अशावेळी या आरोपीच्या विरोधात सरकार पक्षाने सर्वोच्च न्यायालयात तात्काळ धाव घेणे गरजेचे होते. मात्र सरकार पक्ष (सीआयडी) आरोपी विरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील केले नाही. आणि याबाबत सुमनच्या कुटुंबियांनाही काहीएक कळविले नाही.

दरम्यान कुटुंबायांच्या आणि विवेक विचार मंचाच्या मागणीनुसार अधिवक्ता प्रकाश साळसिंगीकर यांची या प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली. जानेवारी २०२५ मध्ये साळसिंगीकर यांनी खाजगी आरोपी डॉक्टर विरोधात सर्वोच्च न्यायालयात जाणेबाबत सीआयडी ला लेखी कळविले. मात्र धक्कादायक बाब म्हणजे २७ मार्च २०२५ रोजी आरोपी विरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याची गरज नसल्याचे पत्र औरंगाबाबत उच्च न्यायालय येथील सरकारी वकील होके पाटील यांच्याकडून देण्यात आले. हे अत्यंत गंभीर आहे. यामुळे आरोपी आणि तपास यंत्रणा (सीआयडीने) यांच्यात लागे बांधे आहेत काय ? अशी शंका उपस्थित होते.

सुमन काळेंना न्याय मिळवून देण्यात सीआयडी प्रचंड उदासीन दिसत असल्याने त्यांच्या कुटुंबाने महाराष्ट्र राज्याचे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगात तक्रार केली. त्यानुसार आयोगाचे उपाध्यक्ष श्री धर्मपाल मेश्राम यांनी २३ मार्च २०२५ सुमन काळे कुटुंबाची भेट घेऊन, ''सीआयडी'' तपासावर नाराजी व्यक्त केली व या प्रकरणात आरोपींविरोधात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ (ऍट्रॉसिटी कायद्या) अंतर्गत कलम दाखल न केलेबाबत ही प्रश्न उपस्थित केले. त्यास ''सीआयडी''ने कोणताच प्रतिसाद दिला नाही.

पुढे ६ फेब्रुवारी २०२६ रोजी धर्मपाल मेश्राम यांनी अधिकृतपणे संचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (सी आय डी) याना पत्राद्वारे या गुन्ह्यात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ यातील तरतुदी लागू करून फेरतपास करणेबाबत कळविले.

एकूणच या संवेदनशील प्रकरणात सीआयडीच्या तपासातील दिरंगाई आणि संशयास्पद भूमिका यामुळे न्याय मिळणेकामी ''एस आय टी'' नेमून आरोपींविधात अॅट्रोसिटी कायद्याच्या तरतुदीनुसार कलम वाढ करून गुन्ह्याचा संपूर्ण फेरतपास करावा अशी सुमन काळे यांच्या कुटुंबीयांची मागणी आहे.

या प्रकरणात कुटुंबियांसोबत विवेक विचार मंच सामाजिक संघटना उभी असून राज्य सरकारकडे पाठपुरावा करीत आहे. सदर संवेदनशील विषय विधानसभेत उपस्थित केल्याबद्दल आमदार विक्रम पाचपुते व

आमदार संग्राम जगताप यांचे आभार.

## बोधेगावमध्ये शॉर्ट सर्किटची भीषण आग

पूर्णपणे जळून खाक झाली. या दुर्घटनेत लाखो रुपयांच्या मालाचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, एका दुकानात गॅस सिलिंडर असल्याने त्याचा मोठा स्फोट झाला. या स्फोटामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेमुळे बोधेगाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून नुकसानग्रस्त व्यापाऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## होमगार्डचे सात लाखांचे मानधन डॉ. सुजय विखेंकडून जमा

स्वतंत्र तरतूद नसल्यास हे मानधन आपण स्वतः देऊ, असा स्पष्ट शब्द त्यांनी दिला होता.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या मागणीची तात्काळ दखल घेत प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या. त्यानुसार २० जानेवारी ते ३ फेब्रुवारी या कालावधीत १९ होमगार्ड तर ४ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी दरम्यान आणखी १९ होमगार्ड अशा एकूण ३९ होमगार्डनी नगरमनमाड महामार्गावर वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली. त्यांच्या सेवेच्या माध्यमातून वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी झाली असून अपघातांचे प्रमाणही घटले आहे.

होमगार्डचे प्रतिदिन १,२८३ रुपयांप्रमाणे एकूण ६ लाख ८८ हजार १९७ रुपये इतके मानधन देय झाले होते. दिलेला शब्द पाळत अहिल्यानगर शहर भाजपा व विखे पाटील परिवार यांच्या वतीने सुमारे सात लाख रुपयांचा धनादेश २४ मार्च रोजी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी उपमहापौर धनंजय जाधव यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

राहुरी शहरातील वाहतूक सुरळीत राहावी, अपघात टाळले जावेत आणि नागरिकांना सुरक्षित प्रवास करता यावा यासाठी घेतलेला हा निर्णय सामाजिक बांधिलकी जपणारा ठरला आहे. डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिलेला शब्द पूर्ण करून केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कृतीतून जनतेचा विश्वास जिंकला असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. नगरमनमाड महामार्गावरील वाहतुकीच्या समस्येवर प्रभावी उपाय करत प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून प्रश्न सोडवता येतात, याचे हे उदाहरण मानले जात आहे. नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी तत्परतेने पुढाकार घेण्याची भूमिका यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाली आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वी जयंती मोठ्या उत्साहाने होणार– सुरेश बनसोडे

कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, अक्षय भिंगारदिवे, अजिंक्य भिंगारदिवे, अमित काळे, गौतम म्हस्के, महेश भोसले, सुजित घंगाळे, जय कदम, अंकुश मोहिते, निलेश शिंदे, अजय पाखरे, सचिन शेलार, गौरव साळवे, राहुल साळवे, शोभा गाडे, विलास साठे, निखिल शेलार, विवेक भिंगारदिवे, विशाल भिंगारदिवे, कौशल गायकवाड, सौरव पंचमुख, पप्पू वाघमारे, करण भिंगारदिवे, यशोदास वाघमारे, आकाश शिंदे, सिद्धांत गायकवाड , वृषाल साळवे , सुनील साळवे , ऋषि गायकवाड ,निलेश शिंदे, रोहन रोकडे, आकाश भिंगारदिवे, सचिन धीवर, महेश पाखर, विकी पाटोळे, अजय आंग्रे, कुपाल भिंगारदिवे, सूर्यकांत पाखरे, सचिन जमधडे, विशाल कदम, आकाश गायकवाड, मुन्ना भिंगारदिवे, करण साळवे, संजय साळवे, गणेश गायकवाड, विशाल गायकवाड, अनिकेत गायकवाड, राहुल साळवे, अजिंक्य भिंगारदिवे, भाऊ भिंगारदिवे, अक्षय भिंगारदिवे, महेश भोसले, सुजित घंगाळे, ऋषी विधाते आदीसह समाज बांधव व पोलीस अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्व. अरुणकाका जगताप यांचा वाडिया पार्क येथे पूर्णाकृती पुतळा उभारावा

स्व. अरुणकाका जगताप याना स्वच्छतेची विशेष आवड होती. त्यामुळे महानगरपालिका हद्दीतील सर्व शाळांमध्ये ''स्वच्छ शाळा सुंदर शाळा'' हा उपक्रम राबविण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण होऊन शाळा व परिसर स्वच्छ राहण्यास मदत होईल. स्पर्धेचे आयोजन करून गुणवंत शाळांना रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात यावे. या उपक्रमासाठी आवश्यक खर्च सुजयदादा विखे पाटील मित्र मंडळ उचलण्यास तयार असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. स्व. अरुणकाका जगताप यांचे सामाजिक कार्य नगरकरांच्या कायम स्मरणात राहावे, यासाठी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या वाडिया पार्क चौकात त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

या पुतळ्यामुळे त्यांच्या कार्याची आठवण पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचेल व नागरिकांना प्रेरणा मिळेल, असेही निवेदनात म्हटले आहे. महानगरपालिका हद्दीत स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ आधुनिक व सुसज्ज असे उद्यान विकसित करण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. या उद्यानामध्ये हिरवाई, शांतता व निसर्ग सौंदर्य जपले जावे. फाऊंटन, कारंजे, विविध औषधी वनस्पतींची लागवड, ज्येष्ठ नागरिकांसाठी जॉगिंग ट्रॅक तसेच लहान मुलांसाठी अत्याधुनिक खेळणी बसविण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. स्व. अरुणकाका जगताप यांच्या जयंतीचे औचित्य साधून शहरात त्यांच्या कार्याची आठवण जपणारे आणि नागरिकांना प्रेरणा देणारे उपक्रम राबवावेत, अशी मागणी नगरसेवक निखिल वारे यांनी केली आहे.

यावेळी स्थायी समिती सभापती पैलवान सुभाष लोंढे, उपसभापती वर्षा सानप, नगरसेवक बाबुशेठ नागरगोजे, मनोज दुल्लम, रेवन्नाथ पवार, दत्त गाडळकर, अनिल धवन, जितू गंभीर, करण काळे, महेश लोंढे, सुजय मोहिते मोहित पंजाबी विशाल नाकाडे, आशा डागवले, सुनिता फुलसौंदर, गीतांजली काळे, संध्या पवार सुजाता पडोळे सुनीता कांबळे वर्षा काकडे सुनीता भिंगारदिवे मयुरी जाधव कमल भोसले अश्विनी लोंढे आशाताई कातोरे अनिता शेटीया रोशनी त्रिंबकेआशाताई कातोरे कमल कोतकर पोर्णिमा गव्हाळे शितल ढोणे सोनाबाई शिंदे मीना चोपडाआदींसह नगरसेवक उपस्थित होते.